# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
# आयोजित,
# शतकमहोत्सवी नाट्यसंमेलनानिमित्त, नाट्य जागर २०२४
# राज्यस्तरीय खुली एकांकिका स्पर्धा
# नियमावली (उपांत्य आणि अंतिमफेरी)

१. सदर स्पर्धा फक्त मराठी भाषेतच होईल. ही स्पर्धा प्राथमिक फेरी, उपांत्य फेरी व अंतिम फेरी ह्या स्वरूपात संपन्न होईल. एकांकिका स्पर्धा ही संस्था, महाविद्यालये इ. सर्वांसाठी खुली असेल.

**उपांत्यफेरी केंद्रे खालीलप्रमाणे :-**

**ग्रुप १-**

**केंद्र :- बोरीवली** १) ठाणे २) मुंबई ३) रत्नागिरी **(१८ मार्च २०२४)**

**ग्रुप २ –**

**केंद्र :- नागपूर** १) नागपूर २) चंद्रपूर ३) अमरावती ४) अकोला ५) नांदेड **(१० मार्च २०२४)**

**ग्रुप ३ -**

**केंद्र :- पुणे** १) पुणे २) सातारा ३) बीड ४) कोल्हापूर ५) सांगली ६) लातूर ७) सोलापूर **(१२ मार्च २०२४)**

**ग्रुप ४ –**

**केंद्र :- नाशिक** १) नाशिक २) जळगाव ३) अहमदनगर ४) औरंगाबाद ५) धुळे **(१३ मार्च २०२४)**

२. लेखकाची परवानगी व रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे प्रमाणपत्र घेण्याची जबाबदारी त्या त्या संस्थांची असेल. सदर अनुमतीपत्र आणि डी.आर.एम. नंबर किंवा एकांकिका परिनिरीक्षण मंडळाकडे दाखल केल्याची पावती स्पर्धेपूर्वी स्पर्धेच्या ठिकाणी केंद्रप्रमुखांना सादर करणे आवश्यक आहे.

३. लेखनाच्या पारितोषिकासाठी नवीन संहितेचाच विचार केला जाईल. एकांकिकेच्या स्वच्छ अक्षरात किंवा टंकलिखित, तीन प्रती व पात्रपरिचय स्पर्धेपूर्वी स्पर्धा प्रमुखाकडे विहित अर्जात देणे आवश्यक आहे.

४. स्पर्धेची उपांत्यफेरी महाराष्ट्रातील आपल्या जवळच्या परंतु विभागवार परिषदेने ठरवून दिलेल्या केंद्रावरच संपन्न होईल. एका स्पर्धकांस कोणत्याही एकाच एकांकिकेत आणि एकाच केंद्रावर सहभाग घेता येईल.

५. एकांकिकेचा कालावधी उपांत्य व अंतिमफेरीसाठी कमीत कमी ३० मिनिटे व जास्तीत जास्त ४५ मिनिटे असेल. अंतिम फेरीसाठी मात्र सादरीकरण आणि नेपथ्य मांडणी आणि रंगमंच मोकळा करणे ह्या संपूर्ण गोष्टींसाठी **एक तासाचा कालावधी** प्रत्येक एकांकिकेला दिला जाईल. वेळेचे बंधन काटेकोरपणे पाळणे हे प्रत्येक संघाचे कर्तव्य असणार आहे.

६. एकांकिका सादर करण्यासाठी जी वेळ दिली असेल त्याच वेळी एकांकिका सादर केली पाहिजे. त्यात बदल केला जाणार नाही.

७. उपांत्यफेरी नाट्यगृहात सादर करावयाची असल्यामुळे नेपथ्य/संगीत/प्रकाशयोजना/रंगभूषा/वेशभूषा यांचा वापर करता येईल.

८. उपांत्य आणि अंतिम फेरीसाठी नाट्य परिषदेच्यातर्फे ८ स्पॉट लाईट, ४ लेव्हल, १ टेबल, ५ खुर्च्या विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जातील. त्यापेक्षा अधिक काही हवे असल्यास केंद्र प्रमुखांशी संपर्क साधावा. विशिष्ट प्रकारचे नेपथ्य अथवा प्रकाश योजना हवी असल्यास त्याची व्यवस्था संबंधित संस्थांना स्वतः करावी लागेल. रंगभूषाकारची व्यवस्था संस्थेने स्वतः करायची आहे.

९. उपांत्य आणि अंतिम फेरीत पात्र ठरलेल्या संघांना कलावंत आणि तंत्रज्ञ ह्यांच्या येण्या-जाण्याचा प्रवास खर्च म्हणून सांघिक रुपये १५/- प्रति किलोमीटर आणि भोजन / अल्पोपहार भत्ता यासाठी प्रत्येकी रुपये १५०/- (जास्तीत जास्त पंधरा व्यक्तींना भत्ता रक्कम देण्यात येईल) प्रवासाचे अंतर पडताळणी करून ठरविण्यात येईल. नाट्य परिषदेने ह्याबाबतीत घेतलेला निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

१०. उपांत्य फेरीतून अंतिम फेरीसाठी नऊ एकांकीकांची निवड करण्यात येईल. अंतिम फेरी यशवंत नाट्य मंदिर माटुंगा, मुंबई ४०००१६. येथे संपन्न होईल. त्याबाबतची तारीख नंतर कळविण्यात येईल.

११. नियम व अटी तसेच स्पर्धेच्या तारखांमध्ये फेरबदल करावयाचे अधिकार अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद राखून ठेवत आहे.

१२. नियम व अटींचे पालन सहभागी संस्था, कलावंत व तंत्रज्ञांना करावेच लागेल. तसे न करणा-या संस्थेला स्पर्धेतून वगळले जाऊ शकते ह्याची जाणीव प्रत्येक संघाने ठेवणे आवश्यक आहे.

१३. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहिल आणि तो सर्व स्पर्धकांना बंधनकारक असेल.

१४. ह्या स्पर्धेत सादर होणाऱ्या एकांकिकांचे/प्रयोगाचे संपूर्ण अथवा अंशतः चित्रीकरण करण्याचा आणि ते प्रसारित करण्याचा अधिकार नाट्य परिषदेने राखून ठेवलेला आहे.

१५. प्राथमिक फेरीत भाग घेतलेले कलावंत उपांत्यफेरीत असणे आवश्यक आहे. यात कोणताही बदल असल्यास मध्यवर्तीची परवानगी घेण्यात यावी.

१६. खास ह्या स्पर्धेसाठी लिहिलेल्या नवीन एकांकिकांमधून तीन एकांकिका सर्वोत्कृष्ट लेखनाच्या पारितोषिकासाठी निवडण्यात येतील. त्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देण्यात येईल.

**स्पर्धेची पारितोषिके :**

रोख रक्कम आणि प्रमाणपत्र असे पारितोषिकांचे स्वरूप असेल.

**अंतिम फेरी – पारितोषिक**

सर्वोत्कृष्ट पारितोषिक :- रू. १,००,०००/- (नवीन सोडून प्रथम निवडलेल्या एकांकिकेसाठी)प्रमाणपत्र

उत्कृष्ट पारितोषिक :- रू. ७५,०००/- प्रमाणपत्र

उत्तम पारितोषिक :- रू. ५०,०००/- प्रमाणपत्र

दोन उत्तेजनार्थ पारितोषिके :- रू. २५,०००/- प्रमाणपत्र

…......…....................

लेखन पारितोषिके - (फक्त खास ह्याच स्पर्धेसाठी लिहिलेल्या नवीन संहितांसाठी लेखनाचे पारितोषिक दिले जाईल)-

सर्वोत्कृष्ट पारितोषिक :- रू. १५,०००/- प्रमाणपत्र

उत्कृष्ट पारितोषिक :- रू. १०,०००/- प्रमाणपत्र

उत्तम पारितोषिक :- रू. ५,०००/- प्रमाणपत्र

...............................

दिग्दर्शन/नेपथ्य/प्रकाश योजना/पार्श्वसंगीत/स्त्री अभिनय/पुरूष अभिनय ह्या साठी प्रत्येकी -

सर्वोत्कृष्ट पारितोषिक :- रू. १५,०००/- प्रमाणपत्र

उत्कृष्ट पारितोषिक :- रू. १०,०००/- प्रमाणपत्र

उत्तम पारितोषिक :- रू. ५,०००/- प्रमाणपत्र

...............................

तीन अभिनय उत्तेजनार्थ :- रु. २०००/- रोख, प्रमाणपत्र स्त्री व पुरूष

**(सर्वोत्कृष्ट पारितोषिक :- रू. २,००,०००/- प्रमाणपत्र ( खास ह्या स्पर्धेसाठीच नवीन लिहिलेल्या आणि सादरीकरणात देखील प्रथम आलेल्या एकांकिकेसाठीच)**